# लोकसाहित्य आणि लोककला

**प्रा. डॉ. सागर अशोक लटके**
कन्या महाविद्यालय, मिरज
Email- sagarlatake20@gmail.com

**प्रस्तावना**

भारतीय लोकसाहित्याला प्राचीन व समृद्ध अशी वैविध्यपूर्ण परंपरा आहे. लोकसाहित्याची मुळे प्राचीन परंपरेत आढळून येतात. लोकसंस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे लोकसाहित्य होय. लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय. किंवा लोकांमध्ये प्रचलित असलेल्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य म्हणता येईल. ग्रामीण संस्कृतीतील रूढी, लोकविश्वास, विधिकर्म आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या मौखिक गीत-रचना, नृत्ये यांचा वेगळा निर्देश करण्यासाठी डब्ल्यू. जे. थॉमस यांनी इ.स. 1846 मध्ये ‘फोकलोअर’ ही संज्ञा योजिली. ‘फोकलोअर’ या इंग्रजी शब्दाला दत्तो वामन पोतदार यांनी ‘लोकविद्या’ ही संज्ञा सुचविली. तर हिंदी साहित्याचे अभ्यासक वासुदेवशरण अग्रवाल यांनी यासाठी ‘लोकवार्ता’ ही संज्ञा सुचविली. परंतु या संज्ञा रूढ होऊ शकल्या नाहीत. ‘लोकसाहित्य’ ही फोकलोरसाठी पर्यायी मराठी संज्ञा प्रथम लोकसाहित्यविशारद दूर्गाबाई भागवत यांनी वापरली आणि तीच पुढे रूढ झाली.

या संज्ञेचे भाषांतर लोकविद्या, लोकायन, लोकवार्ता, लोकवाङ्मय असे निरनिराळ्या प्रकारे करण्यात आले. लोकसाहित्य व लोकवाङ्मय या दोन संज्ञा फोक-लोअर या अर्थाने रूढ झाल्या आहेत. यातील ‘लोक’ ही संज्ञा नागरी संस्कृतीपासून दूर असलेल्या ग्रामजनांसाठी वापरण्यात आली आहे. बौद्धिक किंवा पंडिती परंपरेपासून अलिप्त असलेल्या, त्यातूनच आधुनिक जीवनधाटणीपासून दूर असलेल्या अनागर संस्कृतीतील लोकांचे अभिव्यक्तिविशेष म्हणजे लोकसाहित्य. यात दंतकथा, लोकभ्रम, लोककथा, लोकगीते, म्हणी वाक्प्रयोग, उखाणे, जादूटोणा, मंत्र, अंगाईगीते यांचा समावेश होतो. जन्म-मृत्युप्रसंगीची विधीगीते, लोकनृत्ये, लोकनाट्ये तसेच हवामान, वनस्पती, प्राणी यांविषयीचे जनसामान्यांचे ज्ञान अर्थात ‘लोकविज्ञान’ या सर्वांचा समावेश लोकवाङ्मय किंवा लोकसाहित्य या संज्ञेत होतो.

लोकसाहित्याची व्याख्या करताना प्रभाकर मांडे म्हणतात, “लोकसाहित्य लोकप्रतिभेचा आविष्कार असतो. तसेच लोकांच्या पारंपरिक जीवनाचा संदर्भ दडलेला असतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते. त्यातून समाजमानस अभिव्यक्त होते.” तर लोकसाहित्याच्या संदर्भात आपले मत व्यक्त करताना सरोजिनी बाबर म्हणतात, “विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासानी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असतानाही केवळ पाठांतरांच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या

पिढीला उत्तेजित करणारे ते लोकसाहित्य होय." लोकसाहित्य ही अलीकडच्या कालखंडात विशेषत्वाने गेल्या 30/40 वर्षात अध्ययन-अध्यापकांनी रूळलेली, रूढ झालेली व शास्त्रशुद्ध अभ्यास विषय झालेली संज्ञा संकल्पना होय.

ग्रामीण संस्कृतीतील लोकांच्या अभिव्यक्ति-विशेषांसाठी योजिलेल्या या संज्ञेत लोकपरंपरेतून चालत आलेल्या गायन नृत्याच्या परंपरांचा समावेश असला तरी 'ग्रामीण साहित्य', 'जन-साहित्य', 'जानपदवाङ्मय' या अन्य वाङ्मयप्रकारांपेक्षा लोकसाहित्य हे स्वतंत्र आहे. ते कुणा एका व्यक्तीने लिहिलेले साहित्य नसते. त्यांचा कर्ता अनाम असतो. त्याला गुरुपरंपरेचा चाकोरीबद्ध वारसा नसतो. त्या त्या समाजगटाच्या सांघिक आविष्कारांचे स्वरूप हे लोकसाहित्याचे वैशिष्ट्य असल्याने ते लोक नेणीवेचे अभिव्यक्तिरूप असते. त्याचा आशय ग्रामीण जीवनाशयातून आणि जानपदांच्या संस्कृती विशेषांतून आलेला असला तरी त्यांची रचना अन्य वाङ्मयप्रकारांप्रमाणे व्यक्तिगत प्रेरणांतून होत नसते. म्हणून ग्रामीण साहित्य, जानपद साहित्य ह्या व्यक्तिनिर्मित वाङ्मयप्रकारांहून लोकसाहित्य हे स्वभावतःच स्वतंत्र आहे.

**विषय विवेचन**

मराठी लोकसाहित्याची व्याप्ती खूपच मोठी आहे. लोकसाहित्याचे दालन अतिशय समृद्ध आणि संपन्न आहे. अनेक अभ्यासकांनी ही व्याप्ती स्पष्ट केली आहे. लोकसाहित्यात शाब्द वाङ्मय आहेच पण त्याचबरोबर कृती उक्तीतून लोकजीवनाचा आविष्कार घडवणाऱ्या विविध लोककलांचाही त्यात महत्त्वपूर्ण सहभाग आहे. कारण या लोककलांनीच लोकजीवन आणि लोकसंस्कृती संपन्न व समृध्द बनलेली आहे. लोकजीवनानेच या लोककलांची निर्मिती केली आहे आणि त्यातून लोकमानसाचे दर्शन घडते. कलावंत हाही समाजाचाच एक घटक असल्यामुळे त्याच्यावर त्या मातीचे, प्रदेशाचे संस्कार असतात. आणि हे संस्कार घेऊनच त्याचे आविष्कार होतात.

लोककलांचा आविष्कार हा लोकसमूहाद्वारे होत असतो. लोकसमूहाद्वारे आविष्कृत होणाऱ्या या कलांचे स्वरूप अंशत: वैयक्तिक असले तरी त्या आविष्कारापाठीमागे समूहमन असतेच. व्यक्ती विशेषतेपेक्षा समूहनिष्ठा हेच लोककलांचे व्यवच्छेदक लक्षण असते. सर्वच लोककलांमध्ये परंपरेचा एक धागा असतो. त्यामुळेच लोककलांचे स्वरूप जितके पुरातन तितकेच नित्यनूतन मानले जाते. प्राकृतिक मुक्तपणा, उत्स्फूर्तता व लवचिकता ही लोककलांची अंगभूत वैशिष्ट्ये मानली जातात. त्यामुळेच लोककला या प्राचीन परंपरेतून आलेल्या असल्या तरी त्यांचा वर्तमान आविष्कार ताजा, जिवंत व काळाचे भान राखणारा असतो.

लोककलांची निर्मिती देखील सामाजिक जाणीवेतून होत असते. या सामाजिक जाणीवा शतकानुशतके जिवंत ठेवण्याचे काम या लोककला करत असतात. या कला समाजाचे मनोविचार व मनोविकार प्रतिबिंबित करण्याचे कामही करत असतात. म्हणून लोककला या विधी कर्माच्या साहचर्याने अस्तित्वात येतात आणि सामूहिक नेणिवेतील भावविश्वाचे प्रतिनिधित्व त्या करतात. लोकवाद्ये व लोकमाध्यमांच्या द्वारे या आविष्कृत होतात. या लोककलांचे स्वरूप अनेकविध आहे. प्रस्तुत शोधनिबंधात लोककलांचा थोडक्यात आपण आढावा घेणार आहोत.

**1) विधिनाट्य**

आदिम अवस्थेत मानव सुरक्षिततेसाठी यात्वात्मक विधी करीत असे. विश्वातील यातुशक्तीच्याद्वारे आपल्याला इच्छित घटना घडवून आणण्यासाठी विधी करीत असे. उदाहरणार्थ, पाऊस यावा यासाठी पावसाची

नक्कल करून काही मंत्र म्हणून विधी केला जाई. जमिनीत पीक चांगले यावे म्हणून काही सुफलनविधी केले जात. त्याचेच पुढच्या टप्प्यातील विधी होत. मात्र या विधी मध्ये नाट्यात्मकता - कलात्मकता आली. त्यामुळे हेतू विधी करणे हा असला तरी त्यात नाट्यही असते. म्हणून त्यांना विधिनाट्य म्हणतात.

घरात शुभकार्य झाले की देवीचा गोंधळ घालणे किंवा खंडोबाचे जागरण करणे हे विधी अजूनही महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कुळाचार विधी म्हणून होतात. त्यात कथा, गीत, वाद्य, नृत्य, संपादणी असा नाट्याचाही भाग मोठा असतो. लोक आपला 'खेळ' पाहात आहेत, म्हणून तो रंगला पाहिजे अशी सादरकर्त्यांची भूमिका असते. यात विधीला महत्त्व असले तरी तो नाट्यरूपाने आविष्कृत होतो.

**2) नाट्यात्मक विधी**

अनेक विधी लोकाचारात असे असतात की त्यातील विध्यात्मक गांभीयपिक्षा समारंभ, देखावा, नाटयीकरण यांनाच महत्त्व आलेले असते. आपल्याकडच्या लग्नविधी किंवा राज्याभिषेक विधी करण्यामागे धार्मिकविधीचे उद्दिष्ट असले तरी महत्त्व नाट्यात्मक देखाव्याला येते, म्हणून त्यांना नाट्यात्मक विधी असे म्हणतात.

**3) धार्मिक नाट्य किंवा उपासना नाट्य**

धार्मिक हेतुने विशिष्ट देवतेच्या उपासनेचा विधी म्हणून केल्या जाणाऱ्या विधींचे आविष्कार नाट्यात्मक होतात, ती उपासना नाट्ये किंवा धार्मिक नाट्ये असतात. ती अनेकदा नवस फेडण्यासाठी होतात. कधी ग्रामदेवतेच्या उत्सवाच्या निमित्ताने होतात.

यातील काही नाट्याविष्कार दैनंदिन उपासनेचा भाग असतात तर काही विशेषप्रसंगीच्या उपासनेचा भाग असतात. तसेच काहींचा आविष्कार एखादी व्यक्तीच करते (उदाहरणार्थ, वासुदेव, दिंडीगाण, इत्यादी) तर काही आविष्कार सामूहिक असतात. (उदाहरणार्थ, नमन खेळे, दशावतार) कीर्तनासारखा आविष्कार अंशतः व्यक्तिगत तर अंशतः सामूहिक असतो.

**4) लोकनाट्य**

सामान्यतः सर्वच लोकाविष्कारांचा उगम धार्मिक श्रद्धेतून झालेला असला तरी काही आविष्कार केवळ लोकरंजनासाठीच झाले आहेत. त्यात धार्मिक भाग असलाच तर अगदीच क्षीण स्वरूपात आहे. तमाशामध्ये प्रारंभीचा गण-गौळण हा भाग सोडला तर धार्मिक किंवा देवताविषयक भाग नाहीच. शहरी तमाशामधून तेही हळूहळू हद्दपार होत आहेत. तमाशा पूर्णतः धर्मविरहित लोकरंजन प्रकार झाला आहे.

काही लोकाविष्कारांचा उगम धर्माशी, उपासनेशी संबंधित असला तरी आता त्यातील धार्मिक भाग संपून गेला आहे. ललित प्रकार प्रारंभी कीर्तन व देवतोपासनेशी संबंधित होते. हळूहळू त्यातील उपासनासंबद्ध भाग संपून रंजनप्रधान रूपच शिल्लक राहिले आहे.

कीर्तन प्रामुख्याने धार्मिकतेशी संबंधित असले तरी लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू केल्यानंतर देशभक्तांच्या कथा सांगणारी राष्ट्रीय कीर्तनकार संस्था निर्माण झाली, ती पूर्णतः लोकरंजनातून लोकप्रबोधन करणारी होती. तसे तर वारकरी संतांनीही भारूडासारख्या रचनांमधून लोकप्रबोधन केले. परंतु ते परमार्थाशी व धार्मिकतेशीच संबंधित होते.

**लोकनृत्य**

आपली आदिम संस्कृती नृत्यात्मक होती. त्या काळी नृत्य हे विधीचा भाग होते. प्रभाकर मांडेंच्या मते, आदिम कलाविष्कार संप्रेषणाचे किंवा संदेशवहनाचे माध्यम म्हणूनही होते. नृत्याला रंगभूमीची जननी मानले जाते. लोकमानसाच्या भावभावना प्रकट करण्याच्या उर्मीतून लोकगीतांची निर्मिती झाली. लोकगीतातून लोकनृत्याने आकार घेतला आणि लोकनृत्य हा लोकजीवनातल्या सांस्कृतिक अभिव्यक्तीचा एक अविभाज्य घटक बनला. निसर्गात घडणाऱ्या काही घटना, ऋतुबदल, पेरणी, कापणी, पाऊस येणे अशावेळी ती ती नृत्ये परत परत केली जाऊ लागली. नृत्याचा प्रधान हेतू लोकरंजनच होता, ती समूहाचीच निर्मिती होती. लोकजीवनाच्या आविष्काराचे एक कलात्मक माध्यम म्हणजे लोकनृत्य होय. भावभावनांचा आविष्कार करणे हे लोकनृत्याचे एक प्रयोजन आहे. क्रीडेच्या माध्यमातून शरीराचे संतुलन राखणे, देवदेवतांना आवाहन करणे व संतुष्ट करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे यातुशक्तींना प्रसन्न करून घेणे ही लोकनृत्यामागील प्रयोजने होत. लोकनृत्ये ही गतीच्या माध्यमातून झालेला सामाजिक आविष्कार असतात. त्यात जीवनाच्या आत्मभूत असलेला नेमिक्रम अभिव्यक्त होतो. त्यांच्या यातुप्रधान प्रक्रियेचे कार्य व्यक्ती आणि समष्टीच्या संरक्षणाचे असते. अशी लोकनृत्याची व्याख्या 'स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोअर' मध्ये दिली आहे. सविता जाजोदिया यांनी मराठी लोकनृत्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे. 1) प्रियाराधन नृत्ये, 2) कृषीनृत्ये, 3) युद्धनृत्ये, 4) धार्मिक नृत्ये, 5) जादू नृत्ये, 6) सामुदायिक नृत्ये. खरे तर अभ्यासाच्या सोयीसाठी 1) स्त्रियांची नृत्ये, 2) पुरुषांची नृत्ये, 3) स्त्री-पुरुष संमिश्र नृत्ये असेही त्यांचे वर्गीकरण करणे शक्य आहे.

लोकनृत्यातील हालचालींमध्ये हातवारे, पदन्यास, शरीराची हालचाल इत्यादींमध्ये जसजसा । काटेकोरपणा येत गेला तसतसा शास्त्रीय नृत्याचा पाया निर्माण झाला असावा. लोकनृथ्यात भावाविष्कार असतो तो समूहाचा लोकनृत्य ही मनमोकळी असतात. ही नृत्य कुणीही न शिकवता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत सहज पोहचतात.

**समारोप**

आत्तापर्यंत आपण मराठी लोककला, लोकरंगभूमीचे विशेष, लोकनृत्य आणि लोकनाट्य यांचा सविस्तर विचार केला. लोकपरंपरेचा समृद्ध वारसा म्हणून लोककलांचे कधी धार्मिक विधी म्हणून तर कधी लोकरंजनाच्या प्रधान हेतूने सादरीकरण केले जाते. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या या लोककला अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण आहेत. धर्मविधीसंबंधता हे या लोककलांचे प्रधान वैशिष्ट्य आहे. वासुदेव, पोतराज, भुत्ये, जोगते, स्मशानजोगी यासारख्या लोकदैवतांचे उपासक या लोकरंगभूमीवरचे महत्त्वाचे कलाकार आहेत. तसेच गोंधळी, दशावतारी, कीर्तनकार, बहुरूपी, चित्रकथी अशा कलाकारांनी लोकरंजनाबरोबरच लोकप्रबोधनाचे काम सातत्याने केले आहे.

या लोकरंगभूमीच्या माध्यमातून दैवतावतरणाचा विधी केला जातो. त्यावेळी विविध प्रकारची सोंगे नाचवली जातात. त्यातून ग्रामव्यवस्थेचे आणि ग्रामदैवतांशी संबंधी लोकश्रद्धांचे दर्शन घडते.

या लोककलांच्या आविष्कारात उत्स्फूर्तता असते, लवचिकपणा असतो. यांनी विशिष्ट रचनाबंध स्वीकारलेला असतो. पण लिखित संहिता नसते. सादरीकरणाची कालमर्यादा प्रयोगसापेक्ष असते.

लोकरंगभूमीवरील नाट्यात्म वास्तव हे लोकरंगकर्मी आणि प्रेक्षक यांच्या सहभागाने सिद्ध होते. पुराणे, धर्मग्रंथ, संतसाहित्य यातील धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म हा आशय लोकभाषेतून लोकप्रतिमांतून लोकांपर्यंत पोचवला जातो. नाट्यात्म धार्मिक विधींच्या निमित्ताने लोक एकत्रित येतात आणि एका अर्थाने समाजातील एकजिनसीपणा सांभाळला जातो.

काही लोककलांच्या रचनाबंधात एक समान सूत्र आढळते. उदा. गोंधळ, कीर्तन, ललितात पूर्वरंग आणि उत्तररंग असतो. उत्तररंगात आख्यान लावले जाते. त्या त्या लोककलाविष्कारासाठी विशिष्ट वेशभूषा वाद्यसंगीताचा वापर केला जातो. लोककलांना रचनेचे सौंदर्य आणि नियमही असतात.

लोककलेच्या सादरीकरणाच्या वेळी विशिष्ट रंगमंचाची आवश्यकता नसते. सोंगाची सजावट, मुखबर तयार करणे, पोषाख बनवणे, रंगभूषा करणे यासाठी पारंपरिक माध्यमेच (शेत, भुस्सा, हळद, कुंकू, गुलाल) वापरली जातात.

अलिकडच्या काळात मात्र या लोककलांच्या सादरीकरणात फरक पडत चालला आहे. पूर्वीच्या काळी या लोककला लोकरंपरा, रूढी, श्रद्धा, समजूती, लोकाचार यांना अनुसरून सादर केल्या जात होत्या. धर्मश्रद्धेला अधिकाधिक प्राधान्य होते. पण, जसजसा काळ बदलला तस तसे सादरीकरणाचे स्वरूपही बदलले. काही विधी धार्मिक प्रेरणेतून केले जात असले तरी त्यामागची मनोरंजनाची प्रेरणाही प्रबळ होत आहे. धर्मश्रद्धेतून साकार होणाऱ्या विधीनाट्यांचे परिवर्तन पुढे लोकनाट्यात झाले. आहे. आधुनिकतेच्या रेट्यामुळे लोकनाट्यांत जाणवतील इतके बदल घडून येत आहेत. कीर्तन, भारूडासारखे काही पारंपरिक नाट्यात्म प्रकार मात्र लोकरंजनाबरोबर लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरत आहेत.

**निष्कर्षः**

प्रयोगसिद्ध लोककलांच्या प्रमुख प्रकारांचा आपण परिचय करून घेतला आहे. तरी सर्वच लोककला प्रकारांचे काही समान निष्कर्ष आहेत. ते पुढीलप्रमाणेः

01) बहुतेक लोककला प्रकारांचा उगम धर्मभावनेत आहे.

02) सर्व लोकनाट्ये पूर्वरंग व उत्तररंग अशा दोन भागांत सादर होतात.

03) सर्व लोककला प्रकार नृत्य, नाट्य, वाद्य, संगीत यांचा कमी-अधिक सहभाग असलेले आहेत.

04) बहुतेक सर्व लोककला प्रकारात एखादी पारंपरिक पुराणकथा नाट्यरूपाने दाखवली जाते. ज्यांचा धार्मिकतेपासून संबंध तुटला आहे अशा लोकनाट्यप्रकारात मात्र इतर लौकिक स्वरूपाची कथा नाट्यरूपात दाखवतात.

05) अनेक लोकनाट्यप्रकारात स्त्रियांची कामे पुरुष करतात. आधुनिक तमाशा त्याला अपवाद आहे. परंतु तमाशातही विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत पुरुषच स्त्रीवेष घेत.

06) धार्मिक लोकनाट्याच्या प्रारंभी इष्ट देवतेची पूजा, प्रार्थना सर्वजण करतात व अखेरीस आरती करतात.

07) सर्वच लोकनाट्यांच्या सादरीकरणाची पद्धत परंपरेनुसार ठरलेली असली तरी भोवतालच्या नवीन शहरी करमणूक प्रकारांचा परिणाम होऊन त्यात थोडाफार बदल होतो. अलीकडे तमाशाचे पारंपरिक रूप पार बदलले असून त्यावर हिंदी सिनेमाचा फार मोठा परिणाम झाला आहे. जुने लावणीनृत्य हळूहळू लोप पावत

असून त्यांची जागा सिनेनृत्ये घेत आहेत. काही कीर्तनकारसुद्धा सिनेगीतांच्या चालीवर गाणी रचून म्हणताना आढळतात. उलट शहरी कला लोकनाट्याच्या प्रभावातून घडतात. अशी देवाण-घेवाण सतत चालू असते.

08) यंत्रयुगाच्या आधुनिक काळात सर्वच पारंपरिक धार्मिक लोकाविष्कारातील धर्मभावनेलाही ओहोटी लागलेली आहे.

**संदर्भः-**

1) भागवत दुर्गाः लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स प्रकाशन, मुंबई, 1972.

2) मांडे प्रभाकरः लोकसाहित्याचे स्वरूप, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, पुणे.

3) शिंदे विश्वनाथः लोकसाहित्याची मीमांसा भाग 1, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

4) व्यवहारे शरदः लोकसाहित्य उद्गम आणि विकास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, 1987.